# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 22/06/2020 (सोमवार)

(सकाळ)

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत धापेवाडा येथे दिनांक 21/06/2020 चे 13:00 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सागर शंकरराव राजुरकर, वय 24 वर्ष, रा. धापेवाडा यांचे घरातील समोरील दार अज्ञात आरोपीने तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील कपाटामध्ये ठेवलेल सोन्याचे दागिने कि. 10,000/–रू. व नगदी कि. 25,000/–रू. असा एकुण कि. 35,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पांडे 79722431238 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर तारसा टि पॉईंट मौदा येथे दिनांक 21/06/2020 चे 01.15 वा. ते 02.00 वा. दरम्यान एमएच–40/बीजी–9185 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– प्रदीप चरण मेश्राम, रा. गोरेवाडा वस्ती, काटोल रोड, नागपूर याने त्याच्या ताब्यातील वाहनात रोहा भंडारा येथुन विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 20,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,20,000/–रुपयाचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई अविनाश शेळके, पो. स्टे. मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा देशमुख 9922447045 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. कुही :– दिनांक 31/10/2020 ते दिनांक 19/05/2020 दरम्यान 23 वर्षीय पिडीत/फिर्यादी हीला आरोपी नामे– मुकेश बबन चंदनखेडे, वय 27 वर्ष, रा. डोंगरगाव या दोघांचे मागील 9 वर्षा महिण्यापासुन प्रेमसंबंध होते. आरोपीने पीडितेस लग्नाचे आमीष दाखवुन वारंवार वेगवेगळया ठिकाणी नेवुन तिच्या सोबत शारीरिक संबंध प्रस्थापीत करून लग्नास नकार दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 376, 376 (3)(द), 312 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडवाले 9763234548 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर